# कौटुंबिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन आणि अंतर्गत गृहसजावट : स्वयंरोजगाराची संधी विषयक अध्ययन

**प्रा. डॉ. विजया एन.कन्नाके**
*सहाय्यक अधिव्याख्याता, गृहअर्थशास्त्र*
*जे. एम. पटेल कॉलेज, भंडारा*

***सारांश:***
*आधुनिक काळात आधीच्या तुलनेत राहणीमानाचा दर्जा उंचावलेला आढळतो. महागाईच्या रूद्र रूपाने घराचा देखिल आकार कमी झालेला आढळतो. लहान घरात सर्व सोयी उपलब्ध करण्याच्या व सौंदर्याच्या दृष्टिकोणातून कौटुंबिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन आणि अंतर्गत गृहसजावट या शाखेला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. कमीत कमी वेळात,कमीत कमी पैश्यात व्यवस्थापन कसे करावे, गृहसजावट कशी करावी या सर्वाचे ज्ञान प्राप्त होत असल्याने या ज्ञानाचा वापर करून गृहअर्थशास्त्र विशयाच्या विद्यार्थ्यानींना स्वयंरोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत. त्या अनुशघांने गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थीनींचा अध्ययनाकरीता निवड करण्यात आली असून त्यांच्या ज्ञानाचा कौ ल्याचा विकासाबाबत अभ्यास करण्यात आला. अभ्यासावरून असा निष्कर्ष काढण्यात आला की, गृहअर्थशास्त्र विषयाच्या ज्ञानामुळे विद्यार्थीनींच्या कलागुणात भर पडली आहे,त्यांच्यात आर्थिक प्राप्ती करण्याबाबतचा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे आढळले. त्याबाबत विद्यार्थीनींना प्रोजेक्ट बनविण्यास सांगण्यात आले. त्यांचा स्वयंरोजगार सुरू करण्याच्या विविध व्यवसायाबाबत माहिती प्राप्त झाल्याचे आढळले. त्यांच्यामधे आत्मविश्वास वाढल्याचे निदर्शनात आले.*

***कीवर्ड्स् :***
*स्वयंरोजगार, गृहअर्थशास्त्राचे ज्ञान व महत्व, आवश्यकता, संधी*

**प्रस्तावना :**
जागतिकरणामुळे नौकरीच्या गंभिर समस्या निर्माण झाल्याने सद्यपरीस्थितीत स्वयंरोजगाराची गरज निर्माण झाल्याचे आढळते. आधुनिकरण व तांत्रिकीकरणामुळे यंत्राच्या माध्यमातून बरीच कामे होवू लागल्याने बेरोजगारीची गंभिर समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनात आले. त्याकारणाने स्वयंरोजगाराशिवाय पर्याय नसल्याचे आढळले व स्पर्धात्मक युगात सर्वांनाच नौकरी मिळत नसल्याने ती काळाची गरज होवून बसली आहे. गृहउद्योग, कुटिरउद्योग या प्रकारे स्वयंरोजगार केल्याचे आढळते. गृहअर्थशास्त्र विशयाच्या विविध शाखांच्या ज्ञानाच्या प्राप्तीमुळे विविध स्वयंरोजगाराची निर्मिती उपलब्ध होवून महिलांचे सक्षमीकरण करण्यास मदत होत असल्याचे आढळते. कमी पैश्यात किंवा कमी भांडवलात उद्योग सुरू करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यास मदत होवू शकते. त्यामुळे तिला स्वतःची ओळख बनविण्यास मदत होत आहे. स्त्री हि फक्त चुल व मुल इतपर्यंतच मर्यादित न राहता आर्थिक क्षेत्रात देखिल तीने आपले कतृत्व सिध्द करून दाखवत उंच गगनात गवसनी घालतांना आढळते. खऱ्या अर्थाने महिला सक्षम झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तिच्या कठोर परीश्रमाने घर व बाहेरच्या क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करीत असल्याचे आढळते.

**स्वयंरोजगार :**
"जेव्हा एखादी व्यक्ती स्वतः पैसा व ज्ञान यांचा उपयोग करून व्यवसाय किंवा सेवा करते व त्यापासून अर्थप्राप्ती करते त्याला स्वयंरोजगार म्हणतात."

**संशोधन समस्येची आवश्यकता :**

**उद्दिष्टे :**
1. गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे देण्यात येणाऱ्या ज्ञानाची उपयोगिता जाणुन घेणे.
2. स्वयंरोजगार काळाची गरज आहे का याबाबत परीक्षण करणे.
3. कोणते कोणते व्यवसाय फायदेशिर ठरू भाकतात याचे अध्ययन करणे.
4. कौटुंबिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन आणि अंतर्गत गृहसजावटः स्वयंरोजगाराची संधी विषयक अध्ययन करणे
5. बेकारीची कारणे भाोधुन नोकरी व स्वयंरोजगार यातील फरक लक्षात आणुन देणे व स्वयंरोजगाराचे महत्व पटवून देणे.

**परिकल्पना :**
1. बेरोजगारीची समस्या 31 ते 35 वर्षाच्या वयात जास्त आढळते.
2. बेरोजगारीची समस्या निर्माण होण्यास व्यावसायिक शिक्षणाचा अभाव आहे.

3. स्वयंरोजगार हे मेहनत, जिद्द, चिकाटी,प्रसंग अवधानता, योग्य निर्णयक्षमता व कौ ाल्यावर आधारीत असल्याने सर्व गुण संपादित केल्यास यशस्वी उद्योजक बनू शकतो.
4. स्वयंरोजगारा बाबत गृहअर्थशास्त्र विभागाअंतर्गत प्रशिक्षणाचे आयोजन केले असतांनाही विद्यार्थीनीमधे उद्योजक निर्मीतीचे प्रमाण कमी आढळते.
5. बेरोजगारीची समस्या निर्माण होण्यास कारणीभूत जीवन उपयोगी शिक्षणाचा अभाव असल्याचे आढळले

**व्याप्ती व मर्यादा :**

**व्याप्ती :**

बेरोजगारीचे प्रमाण वाढत असल्या कारणाने नोकरी वर अवलंबुन न राहता स्वयंरोजगार करणे गरजेचे झाले आहे. हा भाग धाणाच्या भोतीचा असल्या कारणाने भोतीतील उत्पन्नावर अंवलबुन राहणे योग्य नाही. त्याकरीता भंडारा शहराचा अभ्यास करण्याकरीता निवड करण्यात आली.

**मर्यादा :**

हा अभ्यास जे.एम.पटेल महाविद्यालय भंडारा पुरताच मर्यादित आहे.

**सैध्दांतीक शिक्षण प्रणाली.**

व्यवसायाशी सुचना देणाऱ्या संघटनेचा अभाव, भारतीय संस्कृतीत मुलांना कुटुंबा कडून जास्त जपले जाते किंवा गोंजारल्या जात असल्याने ऐतखाउ प्रवृत्ती वाढल्याचे आढळते.

**न्यादर्श :**

सहेतूक पध्दतीने निवड करण्यात आली.

**संशोधन पध्दती व साधने :**

स्ंशोधन कार्य सोपे होण्याकरीता तथ्य संकलनाकरीता प्रश्नावली या संशोधन साधनांचा अवलंब केला आहे. माहिती संकलित करण्यासाठी वापरण्यात आलेली प्रश्नावली संबधित विषयाच्या विषय शिक्षकांकडून प्रमाणित केल्या नतंर विद्यार्थ्यांना देण्यात आली. माहिती संकलित करण्याकरीता योग्य पर्याय देण्यात आले आहे..भोकडा प्रमाणाचा वापर करून योग्य ते निष्कर्ष काढण्यात आले.

**अभ्यास क्षेत्राची निवडः**

भंडारा जिल्हयाची संशोधनाकरीता निवड करण्यात आली.

**नमुना पध्दती व नमुना निवड :**

सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

**पूर्व संशोधनाचा आढावा :**

डी व्ही. डबके 1997,यांनी यवतमाळ येथिल सुशिक्षित बेरोजगार तरूण तरूणींच्या समायोजनात्मक समस्यांचा अभ्यास केला असता त्यांच्या निष्कर्षातून असे सिध्द झाले की, सुशिक्षित बेरोजगारी असणाऱ्या तरूणांची संख्या जास्त असल्याचे आढळले. तसेच कला शाखेतील बेरोजगारीचे प्रमाण जास्त असल्याचे आढळले. तरूणी गृहउद्योग करणाऱ्यांचे प्रमाण देखिल जास्त आढळले. त्यामुळे तरूणी पेक्षा तरूणांचे बेरोजगारीचे प्रमाण हे जास्त असल्याचे आढळले.

**निवडलेले उपक्रम :**

1. विद्यार्थीनीनां विविध स्वयंरोजगाराबाबत प्रशिक्षण देण्यात आले.
2. विद्यार्थीनीनां त्यांच्या कलागुणांच्या छदांनुसार विविध स्वयंरोजगाराबाबत प्रोजेक्ट बनविण्यास सांगितले गेले.

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेनुसार विविध स्वयंरोजगाराच्या कोणत्या संधी विद्यार्थ्यानां प्राप्त होवू भाकतात या बाबत माहिती संग्रहित करून त्याबाबत माहिती देण्यात आली.

विद्यार्थीनीनां कोणते कला कौशल्य प्राप्त झाले आहे याबाबत माहिती काढण्यात आली.

**जनसंख्या व न्यादर्श :**

अभ्यासाकरीता 50 गृहअर्थशास्त्र विद्यार्थ्याची निवड करण्यात आली. कला भााखेचा समावे ा करण्यात आला.

**सांख्यिकीय विश्लेषण व अर्थविवेचन :**

सांख्यिकीय विश्लेषणाकरीता व संकलित माहितीचे अर्थविवेचन करण्याकरीता शेकडा प्रमाण यांचा आधार घेतला आहे.

**परिकल्पनांनुसार निष्कर्ष :**

1. लघु उद्योग करण्यास उत्सुक असण्याबाबत

| अ.क्र. | होय | नाही |
|---|---|---|
| 50 | 80 | 20 |
| प्रतिशत | 80 टक्के | 20 टक्के |

वरील तालिकेच्या निरीक्षणावरून असे लक्षात येते की, लघु उद्योग करण्यास उत्सुक असणाऱ्या विद्यार्थीनींचे प्रमाण हे जास्त आढळले. कला कौशल्यांचे प्रशिक्षण विद्यार्थीनींना प्राप्त होत असल्याने त्यांना घर बसल्या लघु उद्योग करणे सहज शक्य असल्याने लघु उद्योग करण्यास उत्सुक असल्याचे निदर्शनात आले.

2. यशस्वी उद्योजक बनण्यास आवश्यक गुणाबाबतचे त्यांचे मत दर्शक सारणी :

| अ.क्र. | वैयक्तिक गुण | |
|---|---|---|
| 1 | मेहनत, | 100 |
| 2 | जिद्द, | 44 |

| | | |
|---|---|---|
| 3 | चिकाटी, | 02 |
| 4 | माहिती | 12 |
| 5 | आवड | ... |
| 6 | बाजारपेठाचे ज्ञान | 02 |
| 7 | योग्य निर्णयक्षमता | 06 |
| 8 | संवादकौशल्य | .. |
| 9 | काटकसर व नियोजन | 06 |
| 10 | वरील सर्व | 28 |

वरील सारणी वरून असा निष्कर्ष निघतो की, स्वयंरोजगार यशस्वी करण्यासाठी मेहनत, जिद्द, चिकाटी यां गुणांना महत्व देणाऱ्यांचे प्रमाण जास्त आढळले.

3. गृहअर्थशास्त्र विषयाच्या ज्ञानाचा उद्योजिका बनण्यास उपयोग होतो का मतप्रणाली दर्शक सारणी

| **होय** | **नाही** | **एकुण** |
|---|---|---|
| 38 | 12 | 50 |
| 46 | 04 | 50 |
| 84 | 16 | 100 |

गृहअर्थशास़्त्र विषयाच्या ज्ञानाचा उपयोग होतो असे मत प्रदर्शित करणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळले.

**निष्कर्ष :**

आजच्या स्पर्धात्मक युगात सर्वांनाच नौकरी उपलब्ध होवू भाकत नसल्याने करीयर म्हणून गृहअर्थशास़्त्र विषयाच्या ज्ञानाचा उपयोग होतांना आढळला. या विषयाच्या ज्ञानामुळे विद्यार्थीनींनी मधे आर्थिक प्राप्ती करण्यास व स्वावलंबी बनविण्याचे प्रात्यक्षिक स्वरूपात कौशल्य हस्तगत होते. त्यामुळे जीवन जगण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. गृहअर्थशास्त्राच्या विद्यार्थीनी मधे आत्मविश्वास निर्माण होतो व कोणत्याही समस्यांचे निराकरण उत्कृश्ठपणे त्या करू शकतात. बऱ्याच विद्यार्थनीनी या स्वतःच्या उदरनिर्वाहाकरीता लघुंउद्योग करून सोबत शिक्षण घेत असल्याचे आढळले. गृहसजावटीचे साहित्य तयार करणे,कपडे शिवणे, विणकाम, भरतकाम करण्याचे काम करतांना आढळल्या. त्यांचे जीवन जगण्यास या विशयाची मदत होते असे मत दर्शविणाऱ्यांचे प्रमाण जास्त आढळले. मात्र कोरोना काळात आर्थिक छळ बसल्याचे त्यांनी मत मांडले. तसेच विद्यार्थीनी मधे उदासिनता आढळते कारण आजकाल सर्व साहित्य रेडिमेड घेण्याची प्रथा पडली आहे. वस्तू मेहनतीने बनविल्यावरही त्याचा मोबदला हा योग्य मिळत नसल्याची खंत व्यक्त केल्याचे आढळले.

**संदर्भ ग्रंथसुची :**

1. *कौटुंबिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन आणि अंतर्गत गृहसजावट : डॉ. वंदना धवड, कांचन किटे, जी. सी. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट 2013, पेज नं. 136ते 138*
2. *गृहव्यवस्थापन आणि आंतरिक सजावट, डॉ सुनंदा वसू, डॉ रजनी मेहरे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती सप्ट॓.2004, पे नं 144 ते 147*
3. *समाजिक संशोधन पध्दती, डॉ. पु ल भांडारकर, म. वि. ग्रं. नि. मं. विद्या बुक्स, औरंगाबाद, चौथी आवृत्ती, 1999*